# जीनोम-संपादित भाताच्या जाती विकसित करणारा भारत जगातील पहिला देश बनला



■केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी भारतात विकसित केलेल्या दोन जीनोम-संपादित भात जातींची घोषणा केली.

### 🇮🇳 भारताने जीनोम-संपादित तांदळाच्या जातींचे 2 नवीन जातींचे अनावरण केले

1】 डीआरआर तांदूळ 100 (कमला)
2】 पुसा डीएसटी तांदूळ 1

### ✅ या दोन्ही प्रजातींच्या मुळे फायदा काय होईल ?

■उत्पादनात 19% वाढ.
■हरितगृह वायू उत्सर्जनात 20% घट.
■7500 दशलक्ष घनमीटर सिंचन पाण्याची बचत.
■दुष्काळ, क्षारता आणि हवामानाच्या ताणांना सहनशीलता सुधारली

### ✅ DRR तांदळाचे वैशिष्ट्य

■DRR तांदूळ 100 - ही जात प्रत्येक ओंबीमध्ये जास्त धान्य देते
■20 दिवस आधी पिकते (130 दिवसात)
■यामुळे पाणी आणि खतांची बचत होऊन मिथेन वायू उत्सर्जन कमी होते
■हैदराबाद येथील भारतीय कृषी संशोधन परिषद-भारतीय तांदूळ संशोधन संस्था (ICAR-IIRR) येथील शास्त्रज्ञांनी - संभा मसुरी (BPT-5204) वर आधारित DRR तांदूळ 100 (कमला) विकसित केला

### ✅ पुसा DST तांदूळ 1 वैशिष्ट्ये

■खारट आणि क्षारीय मातीत 9.66 टक्के ते 30.4 टक्के उत्पादन वाढवू शकते,
■ज्यामुळे उत्पादनात 20 टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता असते.
■नवी दिल्ली येथील ICAR-IARI (भारतीय कृषी संशोधन संस्था) ने कापूस डोरा सन्नालू (MTU 1010) वर आधारित पुसा DST तांदूळ 1 विकसित केला.




■या दोन्ही सुधारित तांदळाच्या जातींमध्ये जास्त उत्पादन आणि हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्याची क्षमता आहे
■या जीनोममध्ये कोणताही परदेशी DNA जोडलेला नाही
■2023-24 या अर्थसंकल्पात, केंद्र सरकारने कृषी पिकांमध्ये जीनोम संपादनासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद केली होती
■ या नवीन जाती CRISPR-Cas वर आधारित जीनोम-एडिटिंग तंत्रज्ञानाचा वापर करून विकसित करण्यात आल्या आहेत,





■या जाती आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू, पुद्दुचेरी, केरळ (झोन VII), छत्तीसगड, **महाराष्ट्र**, मध्य प्रदेश (झोन V), ओडिशा, झारखंड, बिहार, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल (झोन III) या राज्यांसाठी विकसित केल्या गेल्या आहेत.

**टेलिग्राम - चालू घडामोडी 2025**

## अंगोला - आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (ISA) मध्ये सामील होणार १२३ वा सदस्य देश बनला



■ 3 मे रोजी अंगोलाचे अध्यक्ष जोआओ मॅन्युएल गोन्काल्व्हेस लॉरेन्को यांच्या नवी दिल्ली भेटीदरम्यान या करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

■ या वर्षी, भारत आणि अंगोला राजनैतिक संबंधांचा 40 वा वर्धापन दिन साजरा करत आहेत.

✅ **आंतरराष्ट्रीय सौर आघाडी म्हणजे काय ?**




■International Solar Alliance (ISA)

■ही एक जागतिक आंतर-सरकारी करार-आधारित संघटना आहे

■ उद्देश : जागतिक स्तरावर सौर ऊर्जेच्या उपयोजनाला गती देणे

■स्थपणा - 30 नोव्हेंबर 2015

■भारत आणि फ्रान्स यांनी मिळून याची स्थपणा केली

■पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे अध्यक्ष फ्रँकोइस ओलांद यांनी स्थपणा केली

■पॅरिसमध्ये UNFCCC च्या 21 व्या पक्ष परिषदेच्या (COP21) बाजूला संयुक्तपणे ISA लाँच केले.

■अध्यक्ष : आशिष खन्ना

■मुख्यालय: नवी दिल्ली

■सदस्य : 100

■2030 पर्यंत 1 ट्रिलियन डॉलर्सची सौर गुंतवणूक सुरू करणे हे त्याचे ध्येय आहे

## चौंडी येथे झालेल्या राज्यमंत्री मंडळ बैठकीत झालेले निर्णय






■पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त 'पुण्यश्लोक 300' या लोगोचे अनावरण केले

■मुलींसाठी अहिल्यानगरला उभारणार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था

■अहिल्यानगर जिल्ह्यात उभारण्यात येणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयाला अहिल्यादेवी होळकर यांचे नाव

■धनगर समाजातील मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी महसूल विभागाच्या मुख्यालयांच्या ठिकाणी वसतिगृह बांधण्याच्या योजनेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना असे नाव देण्यास मंजुरी.

■धनगर समाजातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेत शिक्षण देण्याच्या योजनेला राजे यशवंतराव होळकर यांचे नाव देण्याच्या निर्णयाला मंत्रिपरिषदेच्या बैठकीत मान्यता.

■पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित व्यावसायिक मराठीसह बहुभाषिक चित्रपटाची शासनामार्फत निर्मिती करणार



चालू घडामोडी 2025

## तीर्थस्थळ विकासासाठी 5500 कोटींचा निधी महाराष्ट्र शासन देणार आहे



महाराष्ट्र शासन

■ चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाचे जतन आणि संवर्धन : 681.32 कोटी

■ अष्टविनायक गणपती मंदिरांचा जीर्णोद्धार: 147.81 कोटी

■ श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकास आराखडा : 1865 कोटी

■ श्री क्षेत्र ज्योतिबा मंदिर विकास आराखडा : 259.59 कोटी

■ श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर विकास आराखडा : 275 कोटी

■ श्री क्षेत्र महालक्ष्मी मंदिर विकास आराखडा : 1445.97 कोटी

■ श्री क्षेत्र माहरगड विकास आराखडा : 829 कोटी

## महाराष्ट्र सरकार राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान राबविणार आणि आदिशक्ती पुरस्कार प्रदान करणार आहे

■ राज्यातील महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य विषयक समस्यांबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणार. अभियानाच्या माध्यमातून जनजागृती आणि चळवळ निर्माण करणार

■ कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे, लिंगभेदात्मक बाबी दूर सारत मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, बालविवाहमुक्त समाजनिर्मिती, लैंगिक शारीरिक अत्याचाराला प्रतिबंध करून हिंसाचारमुक्त कुटुंब आणि समाजनिर्मिती, अनिष्ट रूढींचे निर्मूलन, महिलांना शासकीय योजनांचा लाभ आणि स्वयंरोजगाराच्या संधी यातून आर्थिक विकास

■ हे आदिशक्ती अभियान उत्कृष्टपणे राबविणाऱ्या ग्रामपंचायतींना आदिशक्ती पुरस्कार देणार

■ हे अभियान राबविण्यासाठी 10.50 कोटी रुपये खर्च करणार

## आशियाई विकास बँकेची (ADB) 58 वी वार्षिक बैठक इटली मध्ये पार पडली

■ दिनांक - 4 ते 7 मे 2025

■ ठिकाण- मिलान (इटली)

■ इटलीचे बैठकीचे आयोजन करण्याची ही पहिलीच वेळ आहे

✅ **या वर्षीच्या वार्षिक बैठकीत चार क्षेत्रांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.**



■ **प्रथम**, प्रदेशातील असुरक्षिततेला तोंड देण्यासाठी, ADB 2030 पर्यंत अन्न प्रणाली परिवर्तनासाठी वित्तपुरवठा 40 अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवेल.

■ **दुसरे** , शिक्षण, वित्त आणि बाजारपेठांमध्ये प्रवेश सुधारण्यासाठी ADB डिजिटल तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करत आहे.

■ **तिसरे** , ADB ऊर्जा प्रणालींचे आधुनिकीकरण आणि जोडणी करण्यासाठी गुंतवणूक करत आहे

■ **चौथे**, ADB पायाभूत सुविधा मजबूत करून, परिसंस्था पुनर्संचयित करून त्यांचे संरक्षण करने

### 🏦 आशियाई विकास बँक माहिती

■ Asian Development Bank

■ मुख्यालय: मांडलुयोंग, फिलीपिन्स

■ स्थापना: 19 डिसेंबर 1966

■ 69 सदस्य देश

■ 69 वा देश इजराईल झाला आहे

भारत ADB चा संस्थापक सदस्य आहे

■ भारत चौथा मोठा सदस्य शेयर होल्डर मध्ये

■ सध्याचे अध्यक्ष: मसातो कांड

■ ADB ही आशिया आणि पॅसिफिकमध्ये समावेशक, लवचिक आणि शाश्वत विकासाला पाठिंबा देणारी एक आघाडीची बहुपक्षीय विकास बँक आहे

## भारत आणि युनायटेड किंग्डमने एक ऐतिहासिक मुक्त व्यापार करार (FTA) केला




■रोजगार, निर्यात आणि राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी एक ऐतिहासिक आणि महत्त्वाकांक्षी करार आहे.

■6 मे रोजी करारावर सह्या करण्यात आल्या

■भारताचे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी आणि युनायटेड किंग्डमचे माननीय पंतप्रधान सर केयर स्टारमर यांनी हा करार झाल्याची घोषणा केली

■भारतीय वस्तूंना ब्रिटनमध्ये करमुक्त प्रवेश मिळेल

■युकेला होणाऱ्या 99% भारतीय निर्यातीला शून्य शुल्काचा फायदा होईल

■सध्या 60 अब्ज अमेरिकन डॉलर्सचा द्विपक्षीय व्यापार जो 2030 पर्यंत दुप्पट होण्याचा अंदाज आहे.

### ✅ भारत × Uk व्यापर करारातील मुद्दे

■ब्रिटनच्या बाजारपेठेत शून्य शुल्काचा फायदा 99% भारतीय निर्यातीला होईल.

■एफटीएमुळे कामगार आणि तंत्रज्ञान केंद्रित क्षेत्रांमध्ये उत्पादनावर सकारात्मक परिणाम होतो

■कापड, सागरी उत्पादने, चामडे, पादत्राणे, क्रीडासाहित्य,खेळणी, रत्ने आणि दागिने, अभियांत्रिकी वस्तू, ऑटो पार्ट्स आणि इंजिन आणि सेंद्रिय रसायने यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी निर्यातीच्या संधी खुल्या होतील

■भारतीय आयात शुल्क कमी केले जाईल, ज्यामुळे 90% टॅरिफ लाईन्सवर कपात होईल, त्यापैकी 85 एका दशकात पूर्णपणे टॅरिफ-मुक्त होतील.

■इतर देशांच्या तुलनेत यूकेमध्ये भारतीय वस्तूंची स्पर्धात्मकता लक्षणीयरीत्या सुधारेल.

■भारतात रोजगारासाठी एफटीएमुळे लक्षणीय सकारात्मक फायदा होईल.

■IT/ITES, वित्तीय सेवा, व्यावसायिक सेवा, इतर व्यवसाय सेवा आणि शैक्षणिक सेवा यासारख्या सेवांमध्ये यूकेकडून येणाऱ्या सर्वात महत्त्वाकांक्षी एफटीए वचनबद्धतेचा भारताला फायदा होईल

■डबल कॉन्ट्रिब्यूशन कन्व्हेन्शन अंतर्गत यूकेमध्ये तात्पुरते राहणाऱ्या भारतीय कामगारांना आणि त्यांच्या नियोक्त्यांना 3 वर्षांच्या कालावधीसाठी यूकेमध्ये सामाजिक सुरक्षा योगदान देण्यापासून सूट

## मुंबई बेस्ट बस आता RealTime गुगल मॅप वर पाहता येणार



■मुंबईतील प्रवास आता अधिक सुलभ आणि स्मार्ट होणार असून #बेस्ट बसेसची रिअल-टाईम माहिती गुगल मॅपवर पाहता येणार आहे.

■#बेस्ट आणि गुगल मॅप यांच्यातील हे सहकार्य मुंबईतील सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधेत आमूलाग्र बदल घडवून आणणार आहे

# व्हायब्रंट व्हिलेजेस प्रोग्राम-II ला केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता

■ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली

■केंद्रीय क्षेत्र योजना (100% केंद्र निधी ) म्हणून मान्यता दिली

■केंद्रीय मंत्रिमंडळाने सीमावर्ती गावांच्या विकासासाठी ₹6839 कोटींना मान्यता दिली.

■2024-25 ते 2028-29 या आर्थिक वर्षांसाठी

■एकुण खर्च - 6839 कोटी


■योजनेचे उद्दिष्ट - या कार्यक्रमाचे उद्दिष्ट म्हणजे समृद्ध आणि सुरक्षित सीमा सुनिश्चित करण्यासाठी चांगले राहणीमान आणि पुरेशा उपजीविकेच्या संधी निर्माण करणे, सीमापार गुन्हेगारी नियंत्रित करणे आणि सीमावर्ती लोकसंख्येला राष्ट्राशी जोडणे आणि त्यांना 'सीमा रक्षक दलांचे डोळे आणि कान' म्हणून विकसित करणे, जे अंतर्गत सुरक्षेसाठी महत्त्वाचे आहे

■या गावांसाठी सर्व हवामान रस्ते जोडणी ही MoRD अंतर्गत आधीच मंजूर झालेल्या PMGSY-IV अंतर्गत केली जाईल.

■व्हायब्रंट व्हिलेज चा पहिला टप्पा-1 चा उद्देश चीन सीमेवरील गावांसाठी होता

■व्हायब्रंट व्हिलेज चा दुसरा टप्पा-2 अरुणाचल प्रदेश, आसाम, बिहार, गुजरात, जम्मू आणि काश्मीर, लडाख, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, पंजाब, राजस्थान, सिक्कीम, त्रिपुरा, उत्तराखंड, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमधील निवडक मोक्याच्या गावांमध्ये 2028-29 आर्थिक वर्षापर्यंत राबविला जाईल.

■सीमावर्ती गावांना स्वावलंबी आणि चैतन्यशील बनवण्यासाठी VVP-I आणि VVP-II हा एक परिवर्तनकारी उपक्रम आहे.




## ✅ व्हायब्रंट व्हिलेजेस प्रोग्रॅम काय आहे ❓

■15 फेब्रुवारी 2023 रोजी केंद्र पुरस्कृत योजनेच्या रुपात व्हायब्रंट व्हिलेजेस प्रोग्राम (VVP) ला सरकारने मान्यता दिली .

■याची सुरवात अमित शहा यांनी अरुणाचल प्रदेश मधील किबिथु येथून केली

■पहिल्या टप्प्यासाठी 4800 कोटी मंजूर करण्यात आले होते

■यात पहिल्या टप्प्यात चीनच्या सीमेवरील 17 गावे पर्यटन स्थळे म्हणून विकसित केली जाणार होती

■गावात विविध सोयी उपलब्ध करून देणे जेणेकरून पर्यटन वाढून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल

■संपूर्ण कार्यक्रमात 19 जिल्ह्यांतील 46 गटांमधील 2967 गावांचा समावेश असेल.



## आजच्या महत्वाच्या Oneliner

■ फ्रेडरिक मर्झ यांची जर्मनीचे चान्सलर म्हणून नियुक्ती

■ ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज दुसऱ्या तीन वर्षांच्या कार्यकाळात विजयी

■ सिंगापूरच्या निवडणुकीत PM लॉरेन्स वोंग विजयी

■ सॅन फ्रान्सिस्को खाडीतील कुप्रसिद्ध "अल्काट्राझ तुरुंग" अमेरिका पुन्हा सुरु करणार आहे

■ भारताची पहिली गगनयान मोहीम 2027 च्या पहिल्या तिमाहीत सुरू होणार आहे - इस्रो अध्यक्ष व्ही नारायणनण यांची माहिती

■ पहिल्या राष्ट्रीय मध्यस्थी परिषदेचे (Mediation Association of India) आयोजन नवी दिल्ली येथे 3 मे रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते झाले

## 27% OBC आरक्षणा सहित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे सुप्रीम कोर्ट चे महाराष्ट्र शासनाला निर्देश



💡महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्था

■ एकूण जिल्हे - 36

■ एकूण जिल्हा परिषदा - 34

■ एकूण पंचायत समित्या - 351

■ एकूण महानगरपालिका - 29

■ एकूण नगरपरिषदा - 248

■ एकूण नगर पंचायती - 147

## 7 मे महाराष्ट्रात 16 ठिकाणी स्व-संरक्षण(मॉक ड्रिल) सराव झाला

■ यामध्ये 16 शहरांचा समावेश करण्यात आला होता

■ यामध्ये 16 ठिकाणचे विभाजन 3 श्रेणी मध्ये करण्यात आले

✅ प्रथम श्रेणी मध्ये 3 ठिकाणे

✓मुंबई शहर आणि उपनगर

✓JNPT बंदर

✓तारापूर अणुऊर्जा प्रकल्प

✅ दुसऱ्या श्रेणी मध्ये 8 ठिकाणे

ठाणे, पुणे, नाशिक, रोहा-धताव-नागोठाणे, मनमाड, सिन्नर, थळ-वायशेत व पिंपरी-चिंचवड

✅ तिसऱ्या श्रेणी मध्ये 5 ठिकाणे

औरंगाबाद, भुसावळ, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग



### आतापर्यंत भारतावर झालेले मोठे दहशतवादी हल्ले

| | |
|---|---|
| मुंबई बॉम्ब स्फोट | 12 मार्च 1993 |
| भारतीय संसद हल्ला | 13 डिसेंबर 2001 |
| अक्षरधाम मंदिर हल्ला | 24 सप्टेंबर 2002 |
| मुंबई हल्ला तारीख | 26 नोव्हेंबर 2008 |
| पठाणकोट हल्ला | 2 जानेवारी 2016 |
| उरी हल्ला तारीख | 18 सप्टेंबर 2016 |
| नागरोटा(j&k) हल्ला | 29 नोव्हेंबर 2016 |
| पुलवामा हल्ला | 14 फेब्रुवारी 2019 |
| पहलगाम हल्ला | 22 एप्रिल 2025 |

टेलिग्राम - चालूघडामोडी 2025

जॉईन व्हा 😊

टेलिग्राम - चालू घडामोडी 2025

# GK Booster

## देश आणि त्यांच्या दरम्यान असलेल्या बॉर्डरची नावे



- रॅडक्लिफ लाइन - भारत ✕ पाकिस्तान
- ड्युरंड लाइन- पाकिस्तान ✕ अफगाणिस्तान
- हिंडनबर्ग लाईन - जर्मनी ✕ पोलंड
- मॅकमोहन लाइन - भारत ✕ चीन
- मैजिनॉट लाईन - जर्मनी ✕ फ्रान्स
- मॅनरहेम लाइन : रशिया ✕ फिनलंड
- 17 व्या समांतर रेषा - दक्षिण व्हिएतनाम ✕ उत्तर व्हिएतनाम
- 20 वी समांतर लाईन : लिबिया ✕ सुदान
- 22 वी समांतर लाईन : इजिप्त ✕ सुदान
- 25 वी समांतर लाईन : मॉरिटानिया ✕ माली
- 31 वी समांतर लाईन : इराण ✕ इराक
- 38 वी समांतर लाईन- उत्तर कोरिया ✕ दक्षिण कोरिया
- 49 वी समांतर लाईन- अमेरिका ✕ कानडा
- ओडर-निसे लाइन : पोलंड ✕ जर्मनी
- Blue (निळी) रेषा : लेबनॉन ✕ इस्रायल
- सिगफ्राइड लाइन - फ्रान्स ✕ जर्मनी

जॉईन व्हा 😊

चालू घडामोडी 2025

टेलिग्राम - चालू घडामोडी 2025